# **Subject :HISTORY**

## **F Y B A: 1 st Semester Topic 2**

# **युनिट 2- हडप्पा संस्कृती : कास्ययुगीन सभ्यता**

**प्रास्ताविक- चीन, इजिप्त व सुमेरिया ह्या जगातील प्राचीन संस्कृती मानल्या जात असत .मात्र सिंधू संस्कृतीच्या संशोधनामुळे जगातील प्राचीन संस्कृती मध्ये भारतीय संस्कृतीला हे स्थान प्राप्त झाले. भारत भूमीचा इतिहास पाच हजार वर्षांपूर्वीचा झाला इसवी सन 1921 ते 36 या कालखंडात भारतीय पुरातत्व खात्याच्या प्रयत्नामुळे सिंधू नदीच्या खोऱ्यात उत्खनन होऊन होऊन ही प्राचीन संस्कृती प्रकाशात आली .सिंधू व तिच्या उपनद्यांच्या परिसरात या संस्कृतीचा उदय व विकास झाला त्यामुळे तिला सिंधू संस्कृती असे म्हणतात.हडप्पा व आजूबाजूच्या क्षेत्रात या संस्कृतीचे अवशेष सापडल्यामुळे काही विद्वानांनी या संस्कृतीला हडप्पा संस्कृती असेही नाव दिले .**

**A) भौगोलिक व्याप्ती- डॉ. मार्शल आणि डॉ. राखलदास बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली मोहंजोदाडो येथे उत्खनन करण्यात आले. तर दयाराम सहानी आणि डॉ. व्हीलर यांनी हडप्पा येथे उत्खनन केले त्यामुळे सिंधू संस्कृतीच्या अवशेषांची प्रचंड अशी दोन शहरे सापडली. ही ठिकाणे परस्परांपासून 350 मैल दूर असूनही येथील अवशेषांमध्ये साम्य आढळले .यावरुन ही संस्कृती एवढ्या प्रचंड मोठ्या प्रदेशांत विकसित झाली असे लक्षात येते .सध्या ही दोन्ही शहरे पाकिस्तानात आहेत .या संस्कृतीत चे साम्य असणारी अनेक स्थळे भारतातही सापडली उदाहरणार्थ गुजरात मधील लोथल, रंगपूर , सुतकोटडा ,राजस्थानातील कालीबंगन ,हरियाणातील हिस्सार जिल्ह्यातील बाणवली तसेच उत्तर पश्चिम मध्य भारताच्या प्रदेशात सिंधू संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत .विविध ठिकाणी सापडलेले अवशेष एकाच संस्कृतीचे आहेत .मोहंजदाडो व हडप्पा ही सिंधू संस्कृतीची प्रमुख ठिकाणी असून भारतातील पंजाब राजपुताना ,सौराष्ट्र ,राजस्थान व पाकिस्तानातील सिंध, पंजाब व बलुचिस्तानात या संस्कृतीचा विस्तार झालेला होता .1921 पासून तर 1995 पर्यंत आणि आजतागायत यावर संशोधन चालू आहे आणि हडप्पा संस्कृतीचे नवनवीन पुरावे मिळत आहेत. या संस्कृतीची आजपर्यंत जवळजवळ 350 स्थळे उत्खननात मिळाली आहेत. या शहरांमध्ये साम्यता जशी आहे तशीच विविधता देखील आहे .या संस्कृतीचा विस्तार उत्तरेत जम्मू पासून दक्षिणेत नर्मदा नदीपर्यंत आणि पश्चिमेस मकरांत तटापासून पूर्वेकडे मेरठ पर्यंत पसरलेला आहे. या संस्कृतीचा साधारण विस्तार 12,99,600 चौकिमी मानला जातो. या संस्कृतीच्या समकालीन कोणतीही संस्कृती विस्ताराने एवढी मोठी नव्हती .इतिहासकारांच्या मते, ही संस्कृती पाच हजार वर्षांपूर्वीची आहे.**

**हडप्पाकालीन नगररचना- या संस्कृतीतील नगरे नदीच्या तीरावर बसवली गेली उदाहरणार्थ हडप्पा हे नगर रावी नदीच्या तीरावर तर मोहनजोदडो हे नगर सिंधू नदीच्या तीरावर होते . विविध ठिकाणे नगररचना जवळपास सारख्याच आहेत. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने ही नगरे अत्यंत सुनियोजित होती .सौंदर्यापेक्षा नियोजितपणा व**

उपयुक्तता या गोष्टीला महत्त्व दिले होते. स्थापत्यरचनेत नीटनेटकेपणा होता . नगर रचनेची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे:

1) नियोजित रस्ते- सुरुवातीला नियोजन करून ही नगरे बसवलेली दिसतात .शहरात मोठे व लहान रस्ते असून ते परस्परांना जोडलेले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला रांगेत सर्व घरे होती .प्रमुख रस्ते पूर्व- पश्चिम ,दक्षिण- उत्तर असून एकमेकांना काटकोन करणारे होते .सर्व रस्ते भव्य आणि मजबूत असून एकाच वेळी अनेक वाहने सहजपणे ये-जा करू शकत असत. रस्त्याच्या बाजूला कचराकुंड्या व प्रकाश योजनेसाठी कंदील होते ,रस्त्याच्या दोन्हीकडे सांडपाण्याची गटारे होती. शहरातील निवासस्थाने ,बाजारपेठा व सार्वजनिक इमारतींच्या अनुषंगाने सर्व रस्त्यांची योजना केल्यामुळे संपूर्ण नगररचना नियोजनबद्ध दिसून येते. तसेच कचरा टाकण्यासाठी रस्त्याच्या विशिष्ट अंतरावर खड्डे खोदण्यात आले होते.

2)सांडपाण्याची व्यवस्था- आरोग्याच्या दृष्टीने सांडपाण्याची व्यवस्था केलेली होती. शहरात घरोघरी विहीर असल्यामुळे पाणीपुरवठ्याची सोय भरपूर होती. प्रत्येक घरात प्रशस्त स्नानगृह आणि मोठमोठे सार्वजनिक स्नानगृह देखील होते. यावरून स्नान हा त्यांचा महत्त्वाचा विषय असावा .पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने सांडपाण्याची सोय उत्तम रीतीने केलेली होती . प्रत्येक घरातील सांडपाणी मोरीत द्वारे घराबाहेर काढले होते .शहरातील लहान-मोठ्या रस्त्यांना गटारे होती. घरातील सांडपाणी रस्त्याच्या गटारात सोडलेले होते .लहान रस्त्यांची गटारे मोठ्या रस्त्यांच्या गटांना जोडलेली होती .शहरातील सर्व गटाराचे सांडपाणी मुख्य गटारात सोडलेले होते . गटारे बनवण्यासाठी पक्क्या विटा व दगडाचा वापर केला होता . मुख्य गटारात ठीक ठिकाणी गाळ व पाणी वेगळे करण्याची सोय होती. आधुनिक काळातील ड्रेनेज व्यवस्थेपेक्षा ही सांडपाण्याची व्यवस्था अत्युत्तम दिसून येते.

3) गृह रचना - नगररचनेप्रमाणे गृहरचना देखील सुनियोजित होती. हडप्पा संस्कृतीतील लोकांची घरे रस्त्याच्या दोन्ही बाजूला एकाच रेषेत होती. घरे ही एकमजली , दुमजली व चाळीसारखी होती. श्रीमंतांची घरे दुमजली असावीत . हडप्पा व मोहंजोदाडो या राजधान्या असाव्यात त्यादृष्टीने त्या शहरात व्यापारी, अधिकारी व श्रीमंत लोक राहात असावेत. विटा ,चुना माती व लाकूड अशा वस्तूंचा उपयोग घरबांधणीसाठी केला जाई. दगडाचा वापर फारसा दिसून येत नाही .पाकगृह, बैठक ,सामानाची खोली असे गृहरचनेतील विविध विभाग आधुनिक घराप्रमाणे दिसून येतात .घरापुढे प्रशस्त अंगण ,विहीर मोठे, स्नानगृह होते. घरातील सर्व सांडपाणी बाहेर काढण्याची सोय होती .घरांना प्रशस्त लाकडी खिडक्या व दारे होती. घराचे प्रवेशद्वार रस्त्याच्या विरुद्ध दिशेला होते .छतासाठी विटा ,लाकूड ,चुन्याचा वापर केलेला होता .काही ठिकाणी घराच्या भिंतींना गिलावा केलेला असून रंगही दिलेला होता. दुमजली घरांना अरुंद व उंच जिने होते .काही घरात प्रवेशद्वाराजवळ रखवालदाराची छोटी खोली होती. दोन घरात विशिष्ट अंतर ठेवलेले होते. थोडक्यात ही गृहरचना सूर्यप्रकाश हवा, स्वच्छता ,आरोग्य व उपयुक्तता यांचा विचार

**करून केलेली होती. छोट्या गावांमध्ये काही ठिकाणी उंच व कौलारू, थोडीशी ग्रामीण स्वरूपाची घरे आढळून आली .काही घरात शृंगार प्रसाधनाची स्वतंत्र खोली असून तेथे ड्रेसिंग टेबल आढळून आले आहेत.**

**4) सार्वजनिक इमारती व आरोग्य- हडप्पा संस्कृतीच्या उत्खननात अनेक सार्वजनिक इमारती सापडल्या .संरक्षण व प्रशासनाच्या दृष्टीने मोहंजोदाडो येथे व हडप्पा येथे शहराच्या बाजूस किल्ले होते .त्यात शस्त्रास्त्र, लष्कर ,धान्यसाठा ,कार्यालये व अधिकारी वर्गाची निवासस्थाने असावीत .किल्ल्याभोवती खंदक व तटबंदीही होती .शहरात मोठ्या मोठ्या बाजारपेठा असल्याने ही मोठी व्यापारी केंद्र असावीत .दोन्ही शहरात सार्वजनिक सभागृह, राजदरबार धर्म सभागृह, धान्यकोठार, महास्नानगृह अशा उल्लेखनीय सार्वजनिक इमारती होत्या.**

**रस्ते आणि राजमार्ग ,दोन घरातील अंतर ,अर्धगोलाकार कोपरे, प्रशस्त अंगण ,दिवाबत्तीची सोय ,कचराकुंड्या, मोठी गटारे ,धान्य कोठारे आणि पाणी पुरवठ्याच्या विहिरी, स्वतंत्र पाकगृह, प्रशस्त स्नानगृह ,शहर व गृहरचनेतील नियोजन ही सर्व वैशिष्ट्ये आधुनिकतेची साक्ष देणारी आहेत ही अतिप्राचीन संस्कृती अत्यंत आधुनिक स्वरूपाची होती हे यावरून स्पष्ट होते**

धार्मिक संकल्पना- प्राचीन काळापासून धर्माला मानवी जीवनात महत्वाचे स्थान होते पुरातत्वीयअवशेषांवरून हडप्पा कालीन धार्मिक कल्पनांचे अंदाज बांधलेले आहेत मात्र संशोधनात एखादे मंदिर तूप किंवा स्मारक किंवा धर्मग्रंथ उपलब्ध झालेला नाही उत्खननात सापडलेले शिक्के महा स्नानगृह स्मशानभूमी व धार्मिक ठिकाणांवरून त्यांच्या धर्म कल्पनांचा अंदाज घेता येतो

पशुपती- ही या हडप्पा कालीन प्रमुख देवता असावी कारण पशुपती ची प्रतिमा असलेले प्रसंगी शिक्के सापडलेले आहेत काही विद्वानांच्या मते ही पशुपती देवता म्हणजे नंतरच्या काळातील शिव किंवा महादेव या देवतेचे प्राथमिक रूप होते तसेच मानवी जीवनाला उपयुक्त ठरणाऱ्या पशूंना पूजनीय मानण्याची प्रथा प्राचीन काळापासून दिसून येते प्राण्यांप्रमाणे स्पष्ट पशुंची प्रमुख देवताही या कल्पनेने निर्माण करून तिची उपासना सुरू झाली सर्व प्राणीमात्रांवर सत्ता असलेल्या पशुपती च्या आराधनेला या लोकांनी सुरुवात केली असावी थोडक्यात प्राणिमात्रांचे नेतृत्व करणारी ही देवता होती अनेक शिक्षक यांवर या देवतेचे वेगवेगळे स्वरूप व्यक्त केलेले दिसते उदाहरणार्थ एका शिक्क्यावर पद्मासनात असणारी पुरुष व्यक्ती हरणाच्या कातड्यावर ध्यानस्थ बसलेली आहे तर अजून एका शिक्क्यावर धनुष्यबाण हाती घेतलेली वल्कले नेसलेली ची कार्य करण्याच्या तयारीत असलेली प्रतिमा आढळून आली आहे या आकृतीला काही विद्वान किरातरुपीसशिव असे म्हणतात काही ठिकाणी गोल लांब दगड व खोलगट लांब वर्तुळाकार दगडाच्या आकृती सापडल्या आहेत संशोधकांच्या मतानुसार या शिवलिंगाच्या प्रतिकृती आहेत यावरून हडप्पा संस्कृतीत असणाऱ्या या पशुपती चे पूजन आर्यांनी रुद्र किंवा शिवा रूपात केलेले दिसते यानंतर अनेक ठिकाणी भारतात विषय व पंथाचा विस्तार झाला असावा

हडप्पा उत्खननात अनेक वैशिष्ट्यपूर्ण स्त्री-प्रतिमा अनेक शिक्षकांवर आढळून आल्या आहेत .या प्रतिमा सामान्य स्त्रियांच्या नसून स्त्री-देवतांच्या होत्या यावरून भारतीय धर्म कल्पनेतील मातृशक्ती देवतेची उपासना मोठ्या प्रमाणात केली जाते. ही मातृशक्तीची आराधना हडप्पा संस्कृतीत केली जात होती .

एका शिक्क्यावर वस्त्र विरहित स्त्री उभी असून तिच्यासमोर एक पुरुष भक्त गुडघे टेकून उभा आहे तर दुसऱ्या व्यक्ती नृत्य करण्यात मग्न आहेत .अशा प्रकारची प्रतिमा आहे यावरून शिक्यावरील ही स्त्री मातृदेवता असून समोरील भक्तगण नृत्य कलेच्या माध्यमातून मातृ देवतेची आराधना करीत असावेत .दुसऱ्या एका शिक्क्यावर शीर्षासनातील स्त्री असून केस मोकळे सोडलेले आहेत तर जवळ एक पुरुष शस्त्र घेऊन उभा आहे यावरून ही पृथ्वी देवता असून ती स्त्री- बलिदानासाठी उभी असावी. तसेच उत्खननात अनेक स्त्री-पुरुषांचे नाविन्यपूर्ण पुतळे सापडले आहेत. काही ठिकाणी डोक्यावर अर्धगोलाकार पंख्या प्रमाणे दागिना असून त्या स्त्रीच्या दोन बाजूस दिवे आहेत .संशोधकांच्या मते ,ही स्त्री- देवता नसून पूजा साहित्यातील धूपदीप यासाठी वापरायच्या पुतळ्याअसाव्यात उत्खननात अनेक ठिकाणी सापडलेल्या स्त्रीमूर्तीवरून मातृदेवतेच्या उपासना केल्या जात असाव्यात असे लक्षात येते.

<u>पशपूजा</u>- मनुष्या बरोबर जगणाऱ्या नैसर्गिक पशूंनाही धर्मात अग्रस्थान दिलेले दिसून येते .तसेच भूतदया हा त्यामागचा महत्त्वाचा भाग असावा उपयुक्त प्राण्यांविषयी कृतज्ञता व आदर भावना व्यक्त करण्याच्या दृष्टीने प्राणी पूजेचा उदय झाला विविध प्राण्यांची नाविन्यपूर्ण प्रतिमा असलेले अनेक शिक्के सापडले आहेत. हे प्राणी नेहमीच्या प्राण्यांपेक्षा आकृतीचे आहेत फक्त उपासनेसाठी त्यांची निर्मिती केलेली असावी अनेक शिकयांवर एक शिंगी बैल यांची प्रतिमा आहे या बैलाला एक शिंग असून मानेवर मशीद नाही समोर एक भांडणे नैवेद्याच्या हेतूने दाखवलेले आहेत काही शिक यांवर या एक शृंगी बैलाची मिरवणूक काढलेली आहे म्हणजे हा एकशृंगवृषभ ही त्यांची प्रमुख पशु देवता होती .तसेच इतर काही प्राण्यांच्या प्रतिमा विविध शेतक-यांवर आढळून आल्या आहेत त्यापैकी एका मुद्रेवर गरुडा ची आकृती असून त्याच्या पंखांवर नाग दाखविले आहेत तर काही शिकयांवर नागांच्या प्रतिमा असल्याने ते नागपूजा करीत असावेत. वाघ, हत्ती ,सिंह ,गेंडा हे प्राणीही शिक्यांवर चित्रित केलेले आहेत .थोडक्यात हे लोक गरुड, नाग ,गेंडा, वाघ आणि एकशृंगवृषभ इत्यादी प्राण्यांची उपासना करीत.

<u>अतिमानवी देवता</u>- काही अभिनव कल्पनेत मधून हडप्पाकालीन लोकांनी अतिमानवी देवतांची निर्मिती केलेली होती .मनुष्य व विभिन्न प्राण्यांच्या मिश्रणातून त्यांच्या अतिमानवी देवता अस्तित्वात आल्या .उदाहरणार्थ एका शिक्क्यावर तीन तोंडाचा वाघ असून दुसऱ्या दोन तोंडी असलेली प्रतिमा आहे .एका शिक्क्यावर एका राक्षसाला माणसाचे तोंड आहे . हत्तीची पाठ आणि समोरचा भाग मेंढ्याचा आकाराचा आहे व पाठीमागच्या भागात वाघाचा आहे .शेपटी उंच सिंहाप्रमाणे आहे त्यास बैलाची शिंगे आहेत अशी वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा एका मुद्रेवर आढळून आणि थोडक्यात त्यांना माहीत असलेल्या सर्व प्राण्यांच्या मिश्रणातून ही काल्पनिक पशू देवता उपासनेसाठी निर्माण

**केलेली असावी .नंतरच्या काळात  हिंदू संस्कृतीतील विविध देवतांमध्ये गणपती, नरसिंह इत्यादी देवतांची रूपे अशाच प्रकारची आढळून येतात.**

**<u>इतर देवता</u> -निसर्गातील भौतिक गोष्टींना देखील हडप्पा लोकांनी आपल्या धर्मकल्पनांमध्ये मध्ये समाविष्ट करून घेतले होते कारण अनेक शिक्कांवर निसर्ग प्रतिमा दिसून येतात काही ठ यांवर यांवर चक्र स्वस्तिक या प्रतिमा आहेत तर सूर्य यांची प्रतीकात्मक रूपे ही आहेत काही ठिकाणी  यज्ञ कुंड ही आढळून आले आहे. प्राण्यांबरोबरच सूर्य अग्नी नदी वृक्ष या इसका शक्तीही या लोकांच्या उपास्य देवता होत्या असे दिसून येते याच बरोबर मोहंजदाडो येथील महास्नानगृह यावरून हे लोक जलपूजन व स्नान विधी हा त्यांच्या उपासनेचा एखादा प्रकार असावा असे लक्षात येते याशिवाय नृत्य संगीत गायन हा उपासनेतील एखादा भाग असावा असे लक्षात येतेव**

**उत्खननात आढळून आलेल्या स्मशानभूमीत पुरलेल्या स्त्री-पुरुषांची एकत्रित प्रेते दक्षिणेकडे वृद्धाचे मृत व्यक्तीचे पाय करण्याची पद्धत प्रेताभोवती असणाऱ्या वस्तू व देवदेवतांची शिक्के इत्यादी बाबी वरून असे लक्षात येते की ,हडप्पाकालीन लोकांचा अध्यात्मिक जीवनाशी जवळचा संबंध होता . त्यांचा मृत्यूनंतरच्या जीवनावर विश्वास असावा म्हणूनच मृत शरीराभोवती वस्तू ठेवण्यामागे त्या मृतात्म्यांना सुख-शांती मिळण्याची कल्पना असावी .थोडक्यात प्रार्थना, स्तुति ,बलिदान ,स्नान या उपासनापद्धती मागे पारलौकिक जीवन सुखी करण्याची कल्पना असावी.**

**B) <u>व्यापार व उद्योगधंदे</u>**

**हडप्पा संस्कृती ही शांतताप्रिय व्यापारी संस्कृती म्हणून प्राचीन भारतात प्रसिद्ध होती. पुरातत्वीय साधनांच्या आधारे तत्कालीन आर्थिक जीवनाचे काही अंदाज बांधता येतात. शेती ,पशुपालन ,व्यापार -व्यवसाय अशा काही बाबीं संबंधी आढावा घेता येतो.**

**1) <u>शेती व पशूपालन</u>- हडप्पा लोकांची कृषिप्रधान अर्थव्यवस्था होती आणि शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. अन्नधान्य व कापडाच्या अवशेषावरून शेती उत्पादनाची माहिती मिळते . हे लोक शेतीमधून तांदूळ,गहू ,बार्ली ,वाटाणा ,मोहरी, कापसाचे उत्पादन करीत असत. शेतीच्या मशागतीसाठी गाढवांचा उपयोग करीत .भात व कापूस ही त्यांची प्रमुख पिके होती .लोथल आणि रंगपूर येथे इतर  धान्यांचे  अवशेष मिळाले आहेत .तसेच काही ठिकाणी चरखे सापडले आहेत . त्यावरून भाताचे व कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असावे. कालीबंगन व काही ठिकाणी त्यांचे अवशेष मिळालेले आहेत यावरून परदेशी कापडाचा व्यापार, गिरण्या व कापूस उत्पादनाचे पुरावे आहेत. दिव्याच्या काजळीचे अवशेष काही ठिकाणी उपलब्ध झाले आहेत .त्यावरून तेलबियांचे देखील उत्पादन शेतीमधून केले जात असावे.**

कृषी उद्योगाला पुरक पशुपालन हा त्यांचा दुसरा प्रमुख व्यवसाय होता उत्खननात उपलब्ध झालेल्या खेळण्यांवरून मधूत्यांना माहीत असलेल्या प्राण्यांची माहिती मिळते. गाय-बैल ,शेळ्या-मेंढ्या ,कुत्रे, गाढव ,पोपट हे पाळीव प्राणी असून पशुपालनात त्यांचा समावेश होता. शेतीची मशागत, मांसाहार ,दूध-दुभते ,प्रवास यासाठी पशूंचा उपयोग होत असे .तसेच हत्ती, सिंह, वाघ ,अस्वल ,गरुड माकड ,मुंगूस काही प्राणी त्यांना परिचित होते मात्र घोडा आणि उंट त्यांना माहीत नसावा.

व्यापार व उद्योगधंदे-- हडप्पा कालीन व्यापार भरभराटीला आलेला असावा. हडप्पा कालीन समाज व्यापारामुळे संपन्न झालेला होता .या लोकांचे संबंध पूर्वीपासून अशिया ,आफ्रिका, युरोप ,अशिया खंडाशी होते,असे अनेक पुराव्यांनी सिद्ध झाले आहे .सुमेरिया, मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीक व अफगाणिस्तानात सापडलेल्या अवशेषांवरून हडप्पा संस्कृतीचे ह्या देशांची व्यापारी संबंध होते असे निश्चितपणे सांगता येते. हडप्पाकालीन शिक्के व कापडाचे पुरावे इराक ,इजिप्त येथे सापडले आहेत. त्यावरून या देशांशी हडप्पा संस्कृतीचा निर्यात व्यापार होत असावा.तसेच चांदी ,सोने ,शिसे, मौल्यवान दगडांची आयात इराण ,अफगाणिस्तानातून होत असावी. गुजरात ,राजस्थानातून मोती शंख ,शिंपले, हिमालयातून देवदार लाकूड यांचा व्यापार होत होता. अलंकार व कलात्मक मातीच्या, धातूच्या भांड्यांचा ही व्यापार होत असे .खेळणी व मातीच्या भांड्यांवर नौकांची चित्रे आढळून आल्याने ह्या लोकांचा व्यापार जलमार्गानेही होत असावा हे स्पष्ट होते. मात्र भूमार्गे होणारा व्यापार जास्त होता. भारतातील पंजाब ,राजस्थान ,सौराष्ट्र गुजरात, बलुचिस्थान ,काश्मीर, मध्य प्रदेश या प्रदेशाचा अंतर्गत व्यापार चालू असावा हे स्पष्ट होते. जीवनावश्यक वस्तूंच्या पूर्ततेसाठी अनेक व्यवसाय या लोकांनी सुरू केले .समाजात सुवर्णकार, लोहार ,विणकर व भांडी बनवणारा वर्ग मोठ्या प्रमाणात होता. तसेच कलात्मक मातीच्या वस्तू बनवणाऱ्या कुंभार कारागिरांची संख्या ही बरीच होती .व्यवसायिकांनी मुळे समाजाची अर्थव्यवस्था विकसित झालेली होती.

2) दळणवळण वजन मापे- उत्खननातील खेळणी व शिक्यामधील चित्रा वरून प्रतिमांवरून सिंधु लोकांच्या दळणवळणाची थोडीशी माहिती उपलब्ध होते. वृषभ हा त्यांचा जास्त उपयुक्त प्राणी होता .लहान मुलांच्या खेळण्यात एक गाडा सापडलाआहे त्यावरून एक बैलाची किंवा दोन बैलांची बैलगाडी हे वाहन प्रमुख असावे. त्याचप्रमाणे गाढव ,रेडा व बैलाचा देखील वाहतुकीसाठी उपयोग करत असत. खेळणी, शिक्के व मातीच्या भांड्यांवर नौकांच्या प्रतिमा आढळल्या आहेत. .त्यावरून अंतर्गत व्यापार नदीमार्गे होत असावा. होड्या , बैलगाडी व प्राणी हे त्यांच्या दळणवळणाची साधने होती.

उत्खननात तांबे, ब्रांझ व दगडाची वजन -मापे सापडली आहेत. लहान-मोठी वजने व परिमाणे तसेच लांबी मोजण्याची साधने उपलब्ध झाली आहेत .सूक्ष्म व अतिसूक्ष्म वजन मापावरून त्यांचा व्यापार व अर्थव्यवहार अत्यंत शास्त्रशुद्ध असून त्यावर शासनाचे नियंत्रण असावे असे स्पष्ट होते.

C) <u>हडप्पा कालीन कला आणि तंत्रज्ञान</u>

हडप्पा कालीन लोक कलाप्रिय व कुशल कारागीर होते .त्यांच्या कला प्रतिभेच्या छटा विविध क्षेत्रांत दिसून येतात. उपलब्ध साधनांचा वापर करून त्यांनी आपली कला अभिव्यक्त केली.विविध thisठिकाणी उत्खननात उपलब्ध झालेल्या अवशेषांवरून हे सिद्ध होते. भारतीय कलेच्या इतिहासात हडप्पा संस्कृतीतील या कलाकृती म्हणजेच तत्कालीन इतिहासाचे महत्त्वाची साधने आहेत. गृहरचना ,नगर रचना , मूर्तिशिल्प ,मातीची व धातूची भांडी, विविध अलंकार ही त्यांची कलाक्षेत्रे होती.

हडप्पाकालीन लोकांचे स्थापत्यशास्त्र अत्यंत विकसित झालेले होते .त्यात नियोजन ,उपयुक्तता सुसंगती व आधुनिकता दिसून येते. वास्तुच्या बांधकामासाठी कच्च्या व भाजलेल्या पक्क्या विटांचा वापर केलेला दिसतो. विटांचे आकार प्रमाणबद्ध होते. इंग्रजी एस आकाराच्या असलेल्या विटांचा वापर भिंतीचे कोपरे बांधण्यासाठी केला जाई. पक्या विटांचा रंग लाल होता .साधेपणा हे या घरांचे वैशिष्ट्य होते. एक मजली तसेच अनेक मजली घरे या लोकांनी बांधली होती .घराच्या भिंतींना मातीचा लेप दिला जाई. घरातील सांडपाणी बाहेर काढण्यासाठी एक लहान नाली असे. घरात स्वयंपाकघर, स्नानगृह, धान्यकोठार व शौचालय असे आधुनिक पद्धतीची रचना या काळात केलेली दिसून येते.

भारतीय इतिहासात. मूर्तीकलेला अतिशय महत्त्व आहे. कलात्मक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून सिंधू संस्कृतीतील मूर्तीकलेला विशेष महत्त्व आहे 5000 वर्षांपूर्वी भारतात अशा प्रकारचा विशिष्ट कलापरंपरेचा जन्म झाल्याचे पुरावे या मूर्तीपासून आपणास मिळतात. हडप्पा व मोहंजदाडो या ठिकाणी सर्वाधिक मूर्ती मिळालेल्या आहेत. तसेच भाजलेल्या मातीची शिल्पे, दगडी शिल्पे उपलब्ध झाली आहेत.' दाढीवाला पुरूष' हे दगडीशिल्प मूर्तीकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या शिल्पातील पुरुषाचे दाढीमिशी अलंकारिक पद्धतीने कोरलेली आहे ,त्याचे डोळे विशाल आहेत, कान वेगळ्या सांकेतिक पद्धतीचे असून त्यांना शिंपला सारखा आकार दिलेला आहे .त्याच्या अंगावर शाल पांघरलेली आहे हे शिल्प हडप्पा संस्कृतीतील पुरोहिताचे असावे असे मानले जाते. याच बरोबर दोन पुरुषांची दगडी शिल्पे आढळली आहेत . शिल्पावरील डोक्यावरील केसांचे शिल्पांकन तसेच अंगावरील कपडे अतिशय रेखीव करण्यात आलेले आहेत, केसात काही दागिने घातलेले स्पष्ट दिसून येतात .अशा पद्धतीने निर्माण केलेली उत्कृष्ट शिल्पे येथे आढळली आहेत.

बऱ्याच मुर्त्या चुन्याचा दगड ,लाल दगड रंगीत मऊ दगड व हलक्या पिवळयादगडा पासून बनवलेल्या आहेत. पशु आणि पक्षांच्याही बऱ्याच मूर्ती आढळून आल्या आहेत. पान 63न

दगडाच्या मूर्ती शिवाय मातीच्या मूर्ती सुद्धा या काळात बनवला गेलेला लाल रंगाच्या मातीपासून स्त्री-पुरुषांच्या मूर्ती बनविण्यात आलेल्या या मूर्तींवर लाल रंगाच्या मातीचा रंग हे देण्यात येईल मनुष्य प्राण्यांच्या मूर्ती अनेक ठिकाणी मिळाल्या आहेत पुरुषांच्या मूर्तींमध्ये नामना डांबरी डोळे दाढी विरहीत चेहरा दाखवण्यात आलेला आहे काही मुर्त्यांना शिंगे लावलेले दिसतात मातीची शिल्पे व मुखवटे धार्मिक रीतिरिवाज अशी संबंधित असावीत

मातीच्या मुर्त्या मध्ये स्त्रियांच्या मुर्त्या ही अधिक प्रभावशाली आहेत मूर्तीवरील केस अंगावरील अलंकार शारीरिक शरीर रचना रेखीव उपणाम या सर्वांचा विचार करता या मुर्ती सौंदर्याचे उत्कृष्ट उदाहरण आहेत या काळात मात्र देवतेच्या उपासनेला महत्त्वपूर्ण स्थान असल्याने स्त्री-प्रतिमा बऱ्याच ठिकाणी आढळू आढळून आले ल्या बर्याच ठिकाणी धातूपासून ही मूर्ती बनवली जात असत ब्राँझ धातु ची नर्तकी ची  मूर्ती विशेष उल्लेखनीय आहे या नर्तिकेची थंडावा पाय थोडा समोर चुकलेला असून उजवा हात कमरेवर टेकलेला आहे अकरा सेंटिमीटर उंचीची मूर्ती ही मूर्ती असून हात कोपरापर्यंत बांगड्या घातलेल्या आहेत उत्तम केशरचना केलेली ही नर्तिकेची मूर्ती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे

याशिवाय काही पशूंच्या मातीपासून बनवलेल्या मूर्ती मिळाल्या आहेत .या मूर्तीमध्ये गेंडा ,बकरा, मेंढी, माकडाच्या मूर्ती मिळालेल्या आहेत .काही ठिकाणी विकृत मूर्ती आढळल्या आहेत .उदाहरणार्थ वेगवेगळ्या प्राण्यांच्या संयुक्त मूर्ती बनवल्याचे आढळून आले आहे. याशिवाय  तांबे आणि पितळ यापासून बनवलेला  काही मूर्ती आढळून आल्या आहेत.

हडप्पाकालीन लोकांनी तयार केलेली विविध मातीची भांडी व त्यावर काढलेली नक्षी त्यांच्या कलेची महत्त्वाची ओळख आहे .मातीपासून तयार केलेली  भांडी तांबूस व लाल काळया रंगाची आहेत .ही सर्व भांडी भट्टीत भाजण्यात आल्यानंतर त्यावर रंगीत नक्षीकाम केले जाई .भांड्यांवर रंगकाम करून ती सजवण्याचा प्रयत्न या लोकांनी केलेला होता. रोजच्या वापरात मात्र साध्या भांड्यांचा उपयोग हे लोक करीत असावेत. गुळगुळीत दगडाने भांड्यांवर चकाकी आणली जाई आणि भांडी भाजल्यानंतर त्यावर रंगकाम केले जाई. सध्या उपलब्ध असलेल्या टेराकोटा पद्धतीच्या भांड्याप्रमाणे ही भांडी होती.

याशिवाय उत्खननात अनेक मुद्रा आणि शिक्के मिळाले आहेत .हडप्पा या एकाच शहरात जवळजवळ बाराशे मुद्रा मिळालेल्या आहेत .मुद्रा, चुनखडी ,दगड माती आणि तांब्यापासुन बनवलेल्या आहेत .या मुद्रा गोलाकार, दंडगोलाकार ,त्रिकोणी व आयताकार आकाराच्या आहेत. बऱ्याच मुद्रांवर प्राण्यांच्या प्रतिमा आहेत. त्यात एकशिंगी बैलाच्या प्रतिमा अधिक आढळून आल्या  आहेत.याशिवाय  मातृदेवतेच्या आकृती ही आढळून आल्या आहेत तरी काही भागावर लेख कोरलेले आहेत. हे लेख चित्र लिपीत आहेत. काही मुद्रांवर सप्तमातृका ,त्रिशूलधारी मनुष्य या ही प्रतिमा आढळून आल्या आहेत. या संस्कृतीत वृक्षांना महत्व होते त्यामुळे अनेक मुद्रांवर वृक्षाच्या ही प्रतिमा कोरलेल्या आढळून आल्या. या सर्व मुद्रा व शिक्के तत्कालीन कारागिरांच्या कौशल्याची साक्ष देतात.

खेळणी हे लहान मुलांचे मनोरंजनाचे व करमणुकीचे प्रमुख साधन असावे.मातीपासून बनवलेली आकर्षक ,गमतीदार व कलात्मक खेळणे उपलब्ध झाली आहेत.या खेळण्यांचे अवशेष उत्खननात सापडले आहेत. मातीची गाडी हे साधे परंतु लोकप्रिय खेळणे असावे .बैल मातीचा असून डोक्याला एक छिद्र आहे. या छिद्रातून दोरी घालून त्याच्या मानेतून असलेल्या छिद्रातून बाहेर काढता येते व त्यामुळे बैलाचे डोके हालते .याप्रकारे हलणाऱ्या

माकडाचे ही खेळणी उपलब्ध झाले आहे .लहान मुलांची खेळणी ,आरसा ,वस्तरे ,चटई ,पलंग, खुर्ची , मासे पकडण्याचा, गळ ,बांगड्या ,कमरपट्टे विविध प्रकारचे दागिने या लोकांनी तयार केले आहेत. थोडक्यात अनेक कलाकुसरीची कामे या कारागिरांनी केली आहेत.

कला- स्थापत्य याबरोबरच चित्रकळेतही हे लोक पारंगत होते. अनेक भांड्यांवर त्यांनी चित्र काढलेली आहेत. बरीच चित्रे काळा रंगाने काढलेली आहेत .चित्रात मनुष्याची चित्रे फार कमी असून वृक्ष ,पाणी ,प्राण्यांची चित्रे जास्त प्रमाणात आढळली .प्रामुख्याने पिंपळ आणि खजूर या वृक्षाची चित्रे जास्त प्रमाणात आहेत. आडव्या आणि उभ्या रेषा ओढून त्यामध्ये रंग कामही केलेले आढळून येते . या लोकांची चित्रलिपी असावी आणि त्या लिपीचा वापरही त्यांनी चित्रकलेत केलेला आढळून येतो.

हडप्पाकालीन लिपीचे वाचन आज पर्यंत झालेले नाही. त्यामुळे त्यातील लेखी मजकूर व वांङमय प्रकार समजलेला नाही .त्यामुळे या संस्कृतीचा बराचसा भाग तर्कावर आधारित आहे. भारत आणि पाकिस्तान येथील सिंधू नदीच्या प्रदेशात आणि परदेशातही या संस्कृतीचे हजारो शिक्के सापडले आहेत .अनेक शिक्यांवर विविध प्रतिमा असून त्याभोवती ओळीने काही लहान लहान चित्रे आहेत. विद्वानांच्या मते हि चित्रलिपी असावी त्यांनी केलेल्या संशोधनावरून व अभ्यासावरून या लिपीत 62 मुळाक्षरे 600 जोडाक्षरे आणि 396 अक्षरे खुणा असल्याचा अंदाज आहे . या लिपीचा तमिळ भाषेशी ,, तसेच ब्राम्ही लीपी व इराणी लिपीशी संबंध असल्याचा अंदाज केला आहे .विद्वानांच्या मतमतांतरामुळे या लिपीबाबत निर्णय घेणे कठीण आहे .परंतु ही लिपी ही चित्रांकित असून तिचे बाहेरील देशातील लिपीशी साम्य असणारे अनेक पुरावे सापडले आहेत.

D) <u>हडप्पा संस्कृतीचा शेवट किंवाअस्त</u>-

वैदिक संस्कृतीच्या उदयानंतर हडप्पा संस्कृतीचा शेवट झाला. सामान्यतः इसवी सन पूर्व 2000 ते 1500 या काळात या संस्कृतीचा विनाश झाला असावा त्यासाठी पुढील घटक कारणीभूत ठरल्याचे सांगितले जाते,

1) मोहेंजोदडो येथे एकाखाली एक सात स्तर सापडले त्यावरून नदीच्या पुरामुळे ही संस्कृती नष्ट झाली असावी.

2) अन्नाचे अवशेष , रस्त्यावर व दारात सापडलेली प्रेते यावरून भूकंपासारख्या अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे ही संस्कृती नष्ट झाली असावी. एका ठिकाणी 57 प्रेते एकत्र पुरलेली स्मशानभूमी सापडली त्यावरून रोगराईच्या साथीने ही संस्कृती नाहीशी झाली असावी .

3)काही विद्वानांच्या मते ,आर्यांच्या आक्रमणामुळे ही संस्कृती नष्ट झाली असावी. शांतताप्रिय असलेले हडप्पा कालीन लोक आर्यांच्या आक्रमणापुढे टिकाव धरू न शकल्याने आर्यांनी या संस्कृतीचे विनाश केला असावा.

**थोडक्यात ,5000 या वर्षांपूर्वी एक समृद्ध संस्कृती भारतात निर्माण झाली .या संस्कृतीत कला विकास याबरोबरच प्राणी पूजा, निसर्ग पूजा   उपासना ,वृक्ष पूजा,स्नानविधी  हा धार्मिक वारसा या संस्कृतीकडून भारतीय संस्कृतीने आत्मसात केला .यावरून या संस्कृतीची महानता स्पष्ट होते.**

**संदर्भ ग्रंथ-**

**1)  प्राचीन भारत-डॉ .अनिल कठारे**

**2)भारताचा इतिहास-पी. जी. जोशी**